आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २४ वा ● बुधवार दि. १२ जून २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

### विधान परिषद शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदानाच्या वेळेत वाढ

मुंबई, : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. या निवडणुकीसाठी दिनांक २६ जून २०२४ रोजी मतदान होत आहे. काही संघटनांनी या मतदानाची वेळ वाढविण्यासाठी केलेली मागणी भारत निवडणूक आयोगाने मान्य केली असून; आता मतदानाची वेळ सकाळी ७.०० वाजेपासून सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत अशी असेल.

या निवडणुकीसाठी शुक्रवार, ३१ मे २०२४ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा चार जागांकरिता बुधवार, दि.२६ जून रोजी मतदान तर सोमवार, दि.१ जुलै रोजी मतमोजणी होणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली.

# देशात पहिल्यांदाच केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या बैठकीस मुख्यमंत्री उपस्थित

***पिकांना चांगली किमान आधारभूत किंमत मिळावी* *केंद्रीय कृषी मंत्र्यांना देखील भेटणार – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे***

मुंबई दि. ११ :– तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा आणि अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत. राज्यातही शासन शेतकऱ्यांच्या हिताचेच निर्णय घेत आहे, असे सांगून केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या माध्यमातून देखील पिकांना चांगली किमान आधारभूत किंमत (एमएसपी) मिळून त्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या बैठकीस उपस्थित राहून एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारे शेतकऱ्यांविषयीची वचनबद्धता प्रकट केल्याबद्दल या बैठकीस उपस्थित विविध राज्यांच्या प्रतिनिधींनी टाळ्या वाजवून प्रशंसाही केली. रब्बी पिकांसाठी किमान आधारभूत किंमत निश्रि्चत करण्यासाठी पश्रि्चम भारतातील राज्यांच्या प्रतिनिधींची ही बैठक होती.

सह्याद्री अतिथीगृहात केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, गोवा, दीव आणि दमण तसेच महाराष्ट्राच्या प्रतिनिधी व शेतकऱ्यांची बैठक झाली. या बैठकीचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलतांना मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगितले व शेतमालाला चांगली किंमत व बाजारपेठ मिळावी यासाठी पंतप्रधानांसमोर आपलं म्हणणं नुकतचं मांडले असल्याचे ते म्हणाले.

लवकरच केंद्रीय कृषीमंत्र्यांना भेटणार*

मुख्यमंत्री म्हणाले की, सोयाबीन, कांदा, कापूस या शेतमालाला चांगली आधारभूत किंमत मिळावी, तसेच शेतकऱ्यांच्या इतर प्रश्र्नी देखील आपण लवकरच केंद्रीय कृषीमंत्र्यांना भेटणार आहोत. आज मिलेटचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत असून शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळायचे असेल तर मायक्रो मिलेटस् ला देखील किमान आधारभूत किंमत मिळाली पाहिजे. केंद्र



आणि राज्याची विचारधारा एकच असून पंतप्रधान मोदी यांच्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांना चांगले दिवस येत आहेत. गेल्या दहा वर्षात याची प्रचिती आली आहे. पंतप्रधानपदी शपथ घेतल्यावर नरेंद्र मोदींनी सर्वप्रथम पीएम किसान सन्मान निधीच्या फाईलवर स्वाक्षरी केली आहे. आज राज्य सरकारने देखील शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक निर्णय घेतले असून गेल्या वर्षभरात नुकसान भरपाईपोटी पंधरा हजार कोटी रुपये दिले आहेत.

पर्यावरणाला पूरक बांबूची लागवड

यावेळी मुख्यमंत्र्यांनी वाढत्या प्रदूषण आणि तापमानावर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, मी स्वत:ही शेतकऱ्याचा मुलगा असून मी वारंवार संबधित तज्ज्ञ व्यक्तींशी यावर बोलत असतो. मी गावी गेलो की, आवर्जून झाडे लावतो. विविध प्रकारची पिके घेतो. गेल्या वर्षभरापासून पर्यावरणाला पूरक अशा बांबू लागवडीला आम्ही मिशन मोडवर सुरुवात केली आहे. आमचे राज्य यामध्ये देशात आघाडीवर असून बांबू लागवडीसाठी सात लाख रुपये हेक्टरी अनुदान शेतकऱ्यांना देण्यात येते. यासाठी दहा लाख हेक्टरचे उद्दिष्टही ठरवण्यात आले आहे. बांबूच्या अनेक प्रजाती असून त्याचे वेगवेगळे फायदे आहेत, त्यामुळे टास्क फोर्सच्या माध्यमातून आम्ही येणाऱ्या काळात पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पाऊले उचलत आहोत.

महाराष्ट्र हे देशाच्या पाच ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेमध्ये एक ट्रिलियन डॉलरचे योगदान करण्यासाठी प्रयत्नशील असून यामध्ये शेतीचा देखील मोठा सहभाग असल्याचे मुख्यमंत्रांनी यावेळी सांगितले.

*प्रतिनिधींकडून स्वागत*

केंद्रीय कृषीमूल्य आयोगाच्या बैठकीसाठी खुद्द मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहण्याची घटना देशात पहिल्यांदाच घडली असून यामुळे आता या आयोगाच्या ज्या राज्यांमध्ये बैठका होतील तिथे त्या– त्या मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहण्याचा पायंडा पडेल, असे राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगताच उपस्थित शेतकरी व प्रतिनिधींनी टाळ्यांचा एकच कडकडाट केला. यावेळी बोलतांना पाशा पटेल यांनी मिलेट उत्पादनासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली कशा रितीने पुढाकार घेतला ते सांगितले. पर्यावरणासारख्या **(पान ४ वर)...**

## ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल शर्मा यांना पद्म भूषण पुरस्कार प्रदान

मुंबई, : ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल रामप्रसाद



शर्मा यांना राष्ट्रपतींच्या वतीने राज्य शासनामार्फत पद्म भूषण पुरस्कार प्रदान करून आज सन्मानित करण्यात आले. राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितिन करीर तसेच अपर मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा पाटणकर–म्हैसकर यांनी श्री. शर्मा यांच्या वांद्रे पश्रि्चम येथील निवासस्थानी जाऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान केला. त्याचबरोबर शाल, श्रीफळ, मानपत्र देऊन सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.

मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, राजशिष्टाचार विभागाचे उपसचिव दिलीप देशपांडे, प्यारेलाल शर्मा यांच्या पत्नी सुनीला आणि कुटुंबीय आदी यावेळी उपस्थित होते. प्यारेलाल शर्मा यांनी यावेळी केंद्र सरकारसह राज्य शासनाचे आभार मानले.

या वर्षीचा पद्म पुरस्कार प्रदान सोहळा ९ मे २०२४ रोजी राष्ट्रपती भवन येथे झाला. या सोहळ्यामध्ये श्री. शर्मा उपस्थित राहू शकले नसल्याने राज्याचे मुख्य सचिव आणि मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांच्या हस्ते श्री. शर्मा यांच्या निवासस्थानी जाऊन आज हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## मुलुंड येथील शासकीय मुलींच्या वसतिगृह प्रवेश प्रक्रियेस सुरुवात

मुंबई, : मुलुंड येथील मुक्ता साळवे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह येथे सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षाकरिता रिक्त असणाऱ्या जागेवर प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थिनींनी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्रवेशासाठी संपर्क साधावा, असे आवाहन वसतिगृहाच्या गृहप्रमुखांनी केले आहे.

प्रवेशित विद्यार्थिनींना वसतिगृहात राहण्याची व्यवस्था, भोजन, रुपये ९००–मासिक निर्वाह भत्ता, स्टेशनरी रक्कम, ग्रंथालय सुविधा, दैनंदिनी वर्तमानपत्र इत्यादी मोफत सोयी–सुविधा दिल्या जातात. या वसतिगृहात ११ वी व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींना प्रवेश दिला जाईल.

प्रवेशासाठी पुढीलप्रमाणे पात्रता आवश्यक आहे. प्रवेशासाठी ५५% पेक्षा जास्त गुण असावेत. ती महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावी. या वसतिगृहाचा पत्ता : गृहपाल मुक्ता साळवे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, डी–१० पार्श्र्वनाथ कॉ. हौसिंग सोसायटी, सर्वोदय नगर मुलुंड, मुंबई–४०००८० असा आहे.

## बाल धोरण व कृती आराखड्यासंदर्भात 30 जून पर्यंत हरकती व सूचना सादर करण्याचे आवाहन

मुंबई, : महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल धोरणाचा प्रारुप मसुदा तयार करण्यासाठी गठित समितीने तयार केलेला मूळ मसुदा इंग्रजी भाषेत असून, मराठी भाषेमध्ये त्याचे भाषांतर करण्यात आले आहे. मसुदा शासनाच्या https://womenchild.maharashtra.gov.in, https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नागरिकांकडून मसुद्यामध्ये शब्द रचना, व्याकरण या संदर्भाने हरकती व सूचना ३० जून २०२४ रोजी सायंकाळी ६.१५ वा. पर्यंत मागविण्यात आल्या असल्याची माहिती, महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिली आहे.

नागरिकांनी हरकती व सूचना महिला व बाल विकास आयुक्तालय, २८ राणीची बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ पुणे– ०१ या पत्त्यावर अथवा childpolicygmail.com या ईमेल वर पाठवाव्यात. प्रस्तावित बाल धोरण व कृती आराखडा २०२२ मूळ इंग्रजी भाषेमध्ये तयार करण्यात आला असून त्याचे मराठी भाषेमध्ये भाषांतर करण्यात आलेले आहे.




## लोक माझी लायकी विचारत होते, बीडच्या जनतेने माझी लायकी दाखवून दिली, शरद पवारांसमोर बजरंग सोनवणेंचे धगधगते भाषण

अहमदनगर : मी ज्या बीड लोकसभा मतदारसंघातून खासदार झालो, तेथील लढाई सोपी नव्हती. अगदी सुरुवातीपासून ते प्रमाणपत्र हातात घेईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर मला लढा द्यावा लागला. मात्र, आदरणीय शरद पवार साहेब आणि जनता म इझ्यासोबत होती. देशात सर्वात उशीरा बीडचा निकाल लागला. सत्य परेशान हो सकता है, लेकिन पराजित हो नही सकता, असे वक्तव्य बीड लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांनी केले. ते सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रौप्यमहोत्सवी वर्धापनदिन सोहळ्यात बोलत होते.

यावेळी बजरंग सोनवणे यांनी जोरदार शाब्दिक फटकेबाजी केली. मराठवाड्यात आपल्या पक्षाने फक्त एक जागा लढवली होती. ही जागा मी तुमच्या आशीर्वादाने जिंकली. देशाच्या उच्च सभागृहात जाण्याची संधी मला साहेबांनी दिली, त्याबद्दल त्यांचे आभार. ज्या हिणवलं जायचं, ज्याची लायकी काय, असं विचारलं जायचं, त्याची लायकी बीड जिल्ह्याच्या जनतेने दाखवून दिली. जनतेने प्रत्येकाची लायकी दाखवून दिली आहे. किंबहुना महाराष्ट्रातील जनतेने ज्याची–त्याची लायकी दाखवून दिली आहे, असे बजरंग बप्पांनी म्हटले.

आज आपल्या पक्षाच्या इतिहासात खूप मोठा आनंदाचा दिवस आहे. आज पक्षाने आम्हा सर्वांचा सत्कार केला. पण मी विनंती करतो की, आपली लढाई याठिकाणी थांबत नाही, इथून आपल्या खऱ्या लढाईला सुरुवात होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा ८० टक्के निकाल लागणारा देशातील एकम `व पक्ष आहे. साताऱ्यात शिंदे साहेबांचा निसटता पराभव झाला.

### मनसे, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांचा पक्ष सुपाऱ्या घेऊन निर्माण झालेत, संजय राऊतांचा हल्लाबोल

मुंबई : शिवसेना (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊतांनी राज ठाकरे, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर टीकास्त्र सोडले. मनसे, एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष सुपाऱ्या घेऊन निर्माण झाले आहेत, असा हल्लाबोल संजय राऊतांनी केला आहे. मनसेमध्ये अस्वस्थता आहे का? असा सवाल संजय राऊतांना पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. त्यावेळी त्यांनी जोरदार हल्लाबोल करत टीकेचा बाण सोडला. जेव्हा पक्ष जागेवर असेल तेव्हाच मनसेमध्ये अस्वस्थता असेल. एकनाथ शिंदे, अजित पवार, राज ठाकरे यांच्या पक्षाला जाण नाही, ओढून ताणून बनवलेले हे पक्ष आहेत. त्यांच्यामध्ये कसली अस्वस्थता असणार , असा टोला संजय राऊतांनी लगावला. मनसे, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांचा पक्ष हे सगळे सुपाऱ्या घेऊन निर्माण झालेले पक्ष आहेत. भयातून निर्माण झालेले पक्ष आहेत. शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यावर हल्ले करा आणि त्यांना कमजोर करा, हे त्यांना काम दिलेले आहे. या तिन्ही पक्षांना यासाठी सुपाऱ्या दिल्या आहेत. या सुर्पाया त्यांनी यासाठी स्वीकारल्या आहेत, कारण त्यांना सांगितलं आहे की नाही तर तुम्हाला आम्ही तुरुंगात पाठवू, असेही संजय राऊत म्हणाले. चंद्राबाबू नायडू आणि नितीशकुमार यांच्या मेहेरबानीवर मोदी सरकार आहे, पण त्यांना मोठं मंत्रालय मिळालं नाही. भाजपने सर्व मोठी खाती स्वत:कडे ठेवली आहेत, असे संजय राऊत म्हणाले.

## क्षमतेपेक्षा अधिक प्रवेश देणार्या महाविद्यालयांवर कारवाई करा

लातूर : इयत्ता ११वी व १२वी विज्ञान बोर्ड ग्रुपिंगसाठी ग्रामीण



भागातील सामूहिक कॉपी करणार्या महाविद्यालयांवर व परीक्षा केंद्रांवर कारवाई करावी आणि क्षमतेपेक्षा अधिक प्रवेश देणार्या महाविद्यालयांना निर्बंध घालावेत, अशी मागणी नवीन शैक्षणिक धोरण जनजागृती मंचच्यावतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर व शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

देशभरात लातूरने शिक्षण क्षेत्रात आपला एक आगळा वेगळा पॅटर्न निर्माण केला आहे. येथील शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमातून हे यश मिळाले आहे. मात्र, मागील काही वर्षांपासून ११वी व १२वी विज्ञान शाखेसाठी लागणारी ग्रुपिंग मिळवून देऊ, असे आमिष दाखवून ग्रामीण भागातील काही महाविद्यालये विद्यार्थी व पालकांची दिशाभूल करीत आहेत. यामुळे प्रवेशासाठी शहरातील अनेक विद्यार्थी ग्रामीण भागात जात आहेत. ही बाब 'लातूर पॅटर्न'साठी धोकादायक आहे. परीक्षेच्या बाबतीत सवलती देऊन मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना सामूहिक कॉपी करून उत्तीर्ण केले जात आहे. यामुळे शहरी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. यातून पालकांचीही आर्थिक पिळवणूक होत आहे. त्यामुळे सामूहिक कॉपी करणार्या महाविद्यालयांवर लक्ष ठेवून तसेच चुकीचा प्रकार परीक्षा केंद्रांवर होणार नाही याची दक्षता घ्यावी. सामूहिक कॉपी करण्यात येणार्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करावी, महाविद्यालयाच्या संच मान्यतेपेक्षा अधिक प्रवेश देऊ नये. विभागीय शिक्षण मंडळ व शिक्षण उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती स्थापन करून याची चौकशी करावी, अशी मागणी नवीन शैक्षणिक धोरण जनजागृती मंचच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर कालिदास माने, प्राचार्य डी. एन. केंद्रे, पांडुरंग देडे, प्राचार्य प्रशांत घार, प्रा. एकनाथ पाटील, प्रा. एस. टी. बिरादार, प्राचार्य जी. एन. शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य संजय गवई, प्राचार्य सतीश मारकोळे, उपप्राचार्य दादासाहेब सरवदे, संतोष ढोरमारे, प्रा. ओंकार होनराव, एस. एन. वाडीकर, व्ही. एस. स्वामी आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

# मनोज जरांगेच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची अपडेट; बीपी-शुगर खालावली, अबडचे तहसीलदार तातडीने भेटीला

जालना : मराठा समाजाला सगेसोयरे आणि ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याच्या मागणीसाठी अंतरवाली सराटीत उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली आहे. मनोज जरांगे यांनी ८ जूनला आमरण उपोषण सुरु केले होते. त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस आहे. मात्र, त्यांची प्रकृती लक्षणीयरित्या खालावल्याचे समोर आले आहे. अंतरवाली सराटीत येथे डॉक्टरांचे एक पथक तैनात आहे. मात्र, मनोज जरांगे पाटील यांनी कोणतेही उपचार घेण्यास नकार दिला आहे. यापूर्वी आमरण उपोषण करताना मनोज जरांगे पाटील यांना काहीवेळा सलाईन लावण्यात आली होती. परंतु, सध्या मनोज जरांगे पाटील कोणतेही उपचार घेण्यासाठी तयार नाहीत.

या पार्श्र्वभूमीवर अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक, आणि आरोग्य अधिकारी यांनी मनोज जरांगे यांना उपचार घेण्याचा सल्ला दिला. मात्र जरांगे यांनी उपचार घेणार नसल्याचं स्पष्ट केले. दरम्यान मनोज जरांगे यांना उपचाराची आवश्यकता आहे त्यांची प्रकृती खालावत असून .मनोज जरांगे यांच्या मागण्या, त्यांची उपोषणानंतर प्रकृतीची माहिती आम्ही शासनाला कळवलेली आहे, अशी माहिती तहसीलदारांनी दिली. डॉक्टरांनी काहीवेळापूर्वी मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची तपासणी केली. त्यानंतर डॉक्टरांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, आज सकाळपासून मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली आहे. त्यांच्या शरीरातील रक्तदाब खालावला आहे. उपोषणाचा चौथा दिवस असल्याने त्यांच्या रक्तातील साखरेची पातळीही खालावली आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांना शक्य तितक्या लवकर उपचारांची गरज आहे. अशी माहिती जालन्याच्या आरोग्य जिल्हाधिकारी जयश्री भुसारे यांनी दिली.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक - लोकसभा निवडणुकीत फुटीर राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार घटाने सपाटातुन मार खाल्ल्याने कालच्या राष्ट्रवादी वर्धापन दिनीच अजित पवार यांनी दलित-मुस्लिम जनतेचा विश्र्वास संपादन करून असा मनोदय व्यक्त करून फुटपाड्या कृतीमुळे पश्र्चातापाची जाणीव झाल्याने शरद पवार यांचे बद्दल कृतज्ञता व्यक्त केल्याने हे काय गौडबंगाल आहे तेच कळत नाही. डोकं बधीर झाले.

दुसरा - अरे, बांध फुटत पाणी वाहून गेले मग बांध अडवून काय फायदा घर का भेदी लंका जाळ अशीच अवस्था अजित पवार यांची झालीय शिंदे बरोबर तिर मारायला गेले आणि पाय घसरून पडले मग कृतज्ञतेने काय शिल्लक राहिले.

एक - अहो, पण लोकसभेत पानिपत झाले म्हणून विधानसभा-स्थानिक स्वराज्य संस्था असे-तसे घडू नये म्हणून अजित पवार यांची नरमाई प्रकट होत असावी. शरद पवार यांनी सर्व काही विसरून अजित पवारांना जवळ केले पाहिजे अन्यथा पवार विरुद्ध पवार हे करायचे सूत्र राहील याचे दुःख वाटते म्हणून बोलतोय.

दुसरा - अरे, सत्ता ही बातच निराळी आहे. नातं-गोत, निष्ठा संहिता, मान-सन्मान, अभिमान-स्वाभिमानाला इथं वाव नसतेच केवळ सत्ता, पद, खुर्ची हेच दिसत असते, म्हणूनच अजित पवार यांनी हे असले घातकी टोक स्वीकारले याला पर्याय असूच शकत नाही.

एक - अहो, भाजपला राहण्यासाठी शरद पवार यांनी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे यांना जवळ केले होते आजही उद्धवजी उभे आहेत मग अजित पवाराबद्दल शरद पवार हे कृतज्ञ ठरू शकतात म्हणूनच बोलतोय.

दुसरा - अरे लोकसभा निवडणुकीत बारामती प्रकरणी अजित पवार यांनी सरते घेतले असते तर ही नामुष्की आली नसती- इतरत्रही पराभव पत्करावा लागला नसता. आहे तीही वाहून गेली, मग अडवून, ताणून काही फायदा नाही. काँग्रेस, उद्धवसेना शरद पवार बाजूला करूच शकत नाहीत. उद्याला अजित पवारासारखीच भाजपची परिस्थिती होईल हे लक्षातच ठेव. शरद पवारांनी लोकसभा निवडणुकीत हे गणित दाखवून दिले आहे. एवढेच पुरेसे आहे, समजले.

## काय बोलता राव ?

मागील शतकातील भाजपची यशस्वी वाटचाल आणि २०२४ ते मधील लोकसभा निवडणुकीतील पिच्छहाट लक्षात घेता भाजपा प्रणीत केंद्र सरकारने दक्ष राहून भ्रष्टाचार, दहशतवाद, हिंसाचार, अन्याय-अत्याचार प्रकरणी सावध पवित्रा घेऊन मनिपुर सारख्या हिंसाचार-अत्याचारासह देशभरातील अमानवी कृती, वृत्तीला प्राधान्य प्रमाणे आळा घातला पाहिजे, असा सबुरीचा सल्ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक मोहन भागवत यांनी कार्यकर्ता विकास वर्गाचे समारोप प्रसंगी संबोधीत करतांना दिला.

**काय बोलता राव,**

प्रारंभीच्या काळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत यांचा सल्ला घेऊनच कार्यरत होते. परंतु विश्र्वगुरू बणण्याच्या नादात आयोध्या येथील राम मंदिर, बांधणी, श्री राम प्रभू प्राणप्रतिष्ठेणना प्रकरणी मोहन भागवत यांना डावलून नरेंद्र मोदी हे कार्यरत असल्याचा राग भागवतांच्या मनात होता. त्यात लोकसभा निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याची संधी मिळाल्याने आरएसएसच्या मोहन भागवत यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कान पिचक्या घेऊन सल्ला, शब्दाचे पांघरून घातले असावे, दुसरे काय. बोला दाजीबा !

## ४ बांगलादेशींनी मुंबईत मतदान केल्याची माहिती, मुंबई पोलिसांनी मुसक्या आवळल्या!

मुंबई : बनावट पासपोर्टच्या आधारे भारतात आलेल्या ४ बांगलादेशींच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. दहशतवाद विरोधीपथक जुहू युनिटने चारही जणांना अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे यातील पहिल्या दोन जणांनी लोकसभेच्या निवडणुकीत मुंबईतील जोगेश्वरी येथे मतदान केल्याची माहिती सम ोर आली आहे. दहशतवाद विरोधी पथकाने चारही बांग्लादेशींवर कलम ४६५, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. सह कलम १२ (१अ) भारतीय पारपत्र अधिनियम १९६७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन भारतीय पारपत्र प्राप्त करणाऱ्या खालील नमुद मुळच्या बांगलादेशी इसमांना अटक करण्यात आली. अटक केलेल्या बांगलादेशींनीकडून पोलिसांनी ते सुरत, गुजरात येथे राहण्यास आहे असे पुरावा प्राप्त केले आहेत. तपासात आरोपींव्यतिरिक्त अन्य ५ जणांनीही बनावट कागदपत्र बनवल्याचे समोर आले असून पोलिस तपास करत आहेत. या आरोपीमधील एक आरोपी या बनावट कागदरपत्रांच्या आधारे सौदी अरेबिया येथे नोकरीसाठी गेल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. .

# समतोला मागचे धोरण !

विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा देऊन पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून भारताचा केंद्रीय सत्ता हस्तबद केली आणि भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची बरोबरी सादरी परंतु पंडित नेहरू आणि नरेंद्र मोदी यांच्या कार्याची कृती-वृत्तीची तुलना होऊ शकत नाही नेहरू लोकशाही, सामाजिक ,न्याय, भारताचा सर्वांगीण विकास, समानता, अन्न वस्त्र, क्षेत्राची क्षमता वाढवून भारताला सक्षम करणारे धोरण पंचशील तत्त्वाचे अनुकरण करणारे पंतप्रधान म्हणून नेहरूची कारकीर्द राहिलेली आहे तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे हिंदुत्ववाद, अंधश्रद्धा, देवपूजा करणारे राम भक्त वाढवून भारताला मनुसंस्कृतीकडे नेणारे, जात धर्म भक्कम करून देशाला कमकुवत करणारी प्रक्रिया करणारे, आर्थिक विकास, महासत्ता भारत देश बनविण्याची फसवी आश्र्वासने-ग्वाही देणारे प्रधानमंत्री म्हणून गेली दहा वर्ष कार्यरत असून तिसऱ्यांदा प्रधानमंत्री बनले असले तरी ते पंडित नेहरू यांची बरोबरी तर करूच शकत नाहीत उलट समतोलाची भाषाही करू शकत नाहीत अशीच प्रतिक्रिया राजकीय वर्तुळातून व्यक्त होताना दिसते आहे.

लोकसभा निवडणुकीत बहुमत मिळाले नसतानाही गोधडी सरकार बनविण्यासाठी चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार यांच्या पक्षाशी हात मिळवणे करून नरेंद्र मोदी यांनी केंद्रात सत्ता स्थापन करून एक विक्रम प्रस्थापित केला असला तरी नाका परीस नथनी जड असेच मंत्रिमंडळ बनविल्याने ते भातकुलीच्या

## संपादकीय...

खेळामध्ये राजा आणि राणी, अर्ध्यावरती डाव मोडीला अधुरी एक कहानी! अशीच मोदी-परवाची अवस्था होईल अशी ही कुशंका राजकीय वर्तुळात व्यक्त होताना दिसते हेआहे. वास्तवात भाजपचे निवडणूक निकालापूर्वी जे. जी आव्हाने, भाकीते गेली होती. त्या-त्या आव्हानाचा, भाकीताचा यांचा, विरोधी पक्ष संपल्याचा दावा वगैरे आकांक्षाचा सफाचा झाल्याने नैतिक जबाबदारी स्वीकारून सत्तेपासून दूर होणे गरजेचे होते परंतु सत्तेच्या मोहापायी नितेश कुमार चंद्रबाबूची करावी लागली. असली तरी ते समतोलाची भाषा करून छाटले तरी सुरात आहेतच की म्हणून नेहरूजीची बरोबरी करीत असले तरी लोकसभा अध्यक्षपदच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सरकारला भारी पडेल अशीच प्रतिक्रिया सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होताना दिसते आहे. केंद्र सरकारमध्ये सत्ताधार्जीण्या गटा-पटाला घेऊन मोदी सरकार बनविले असले तरी अंतर्गत मतभेद आणि चंद्रबाबू नायडू, नितीश कुमार यांच्या धर्मनिरपेक्ष आणि सत्तांशी धोरणामुळे मोदी सरकार किती तग धरू शकते हे सांगणे कठीण वाटते कारण अग्नीवीर धोरण रद्द करणे, अन्न वस्त्राची निर्मिती हे विषय मोदींना अडसर ठरू शकतात त्यात महाराष्ट्रातील समतोलही उद्याच्या विधानसभा स्थानिक स्वराज्य संस्थानाची निवडणुकीत भाजपला भासदायक ठरू शकतात अशी राजकीय वर्तुळात उघडपणे चर्चा होताना दिसते आहे. महाराष्ट्रातील भाजप नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे स्वयंभू, क्रियाशील-विकासकर्ण्यर्णे असल्याने त्याच्यापुढे भाजपा नेतृत्वाची किंवा विरोधकाची डाळ शिजत नाही दुसरे केंद्रीय मंत्री श्री पियुष गोयल हे पक्षश्रेष्ठीचे विश्र्वासू असले तरी महाराष्ट्राच्या राजकारणात ते हातबल ठरतात तर नवे नेते मंत्री बनलेले रक्षा खडसे कितपत सत्ता कारण करू शकतात त्यावरच त्याचे यश अवलंबून असले तरी शिंदे सेनेचे प्रताप जाधव हे निकटचे मंत्रीपद सांभाळून भाजपपेक्षा शिवसेनेत अधिक बळ देतील तर सोबतीला आमदार-खासदार नसतानाही एकाला चलो रे म्हणाणरे अरे पाहिजे खासदार रामदास आठवले हे शिवसेना-भिमसेना युतीचा आधार घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था विधानसभा निवडणुकीत ते आपला पिंगा दाखवू शकतात अशी चर्चा होताना दिसत असली तरी मीच मी म्हणून श्रमक राखी नारे वंचितचे अँड. प्रकाश आंबेडकर यांची भूमिका ही तारक-मारक ठरू शकते यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे समतोल धोरण उद्याच्या विधानसभा निवडणुकीत तग धरतील काय अशीही शाशंक लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे एवढेच.

# 'सचेत' प्रणाली- आपत्ती काळातील 'संदेशादुत'

सिंधुदुर्गनगरी, (जि.मा.का): आपत्ती व्यवस्थापन म्हणजे नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तींच्या वेळी जीवन आणि मालमत्तेचे संरक्षण करणे होय. नैसर्गिक आपत्ती, पूर, चक्रीवादळ, भूकंप, रोगाचा प्रादुर्भाव आणि दुष्काळ यांमध्ये आपत्ती व्यवस्थापन महत्त्वाची भूमिका बजावते. आपत्ती व्यवस्थापन करताना कोणत्याही आपत्तीची पूर्व सूचना मिळणे खूप महत्वाचे असते ज्यामुळे होणारी हानी कमी करता येऊ शकते.

यासाठी National Disaster Management -uthority åhUOoM NDM- ने एक एप्लिकेशन म्हणजेच प कार्यान्वित केले आहे. ज्याचे नाव आहे सचेत. या सचेत विषयी अधिक माहिती जाणून घेणार आहोत. हे प वापरण्यास अगदी सोप्पे आहे.Google App Store किंवा ळजड प्रणालीवर जाऊन हे प डाऊनलोड करायचे आहे. डाऊनलोड केल्यानंतर इतर प प्रमाणे आपला मोबाईल क्रमांक भरून नोंदणी करावयाची आहे. त्यानंतर आपल्या मोबाईलवर एक जढ्झ क्रमांक येतो तो टाकला की आपण हे प वापरू शकतो. नोंदणी केल्यावर आपण आपले लोकेशन टाकले की आपल्या परिसरातील हवामान तसेच इतर आपत्ती विषयक माहिती तात्काळ उपलब्ध होते. विशेष म्हणजे ह्या app मधील Subscribe Location मध्ये जाऊन आपण पाहिजे त्या ठिकाणचे हवामान, आपत्ती विषयक परिस्थिती जाणून घेऊ शकतो.

ह्या app 'Yrb Disaster Survival Guide या विशेष चौकटीमध्ये (Window) गेल्यावर आपल्याला विविध आपत्ती परिस्थितीमध्ये जसे की हिमस्खलन, चक्रीवादळ, त्सुनामी, पुर, भूकंप, रासायनिक गळती, जैविक आणीबाणी काय करावे आणि काय करू नये याची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे जी आपल्यासाठी खूप महत्वाची आहे. शिवाय हा app मध्ये जगामध्ये लगतच्या काळात कुठे भूकंप झाले, त्याची तीव्रता काय अशा अनेक घटकांची माहिती देखील उपलब्ध आहे. तसेच आपल्याला आपत्तीच्या प्रसंगी काही मदत हवी असल्यास ११२ क्रमांकावर संपर्क साधण्याची देखील सुविधा देण्यात आलेली आहे. सर्वांनी आपल्या मोबाईलवर हे प डाऊनलोड करणे आवश्यक आहे. चला तर मग जाणून घेऊया या प विषयी.

'सचेत' ही प्रणाली जागतिक स्तरावर स्विकृत कॉमन अलटिंग प्रोटोकॉल (C-P) मानकांवर आधारित असून याची संकल्पना NDM- द्वारे प्रत्यक्षात आणली गेली तसेच ही योजना पूर्णतः छ्ञ्ञ्च- पुरस्कृत आहे.

ही प्रणाली गृह मंत्रालय तसेच सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेश यांना त्यांच्या नागरिकांना स्थानिक भाषांमध्ये स्थान आधारित आपत्ती सतर्कतेचा संदेश प्रसारित करणे, लोकांना वेळेवर पूर्वसूचना देणे व त्या माध्यमातून जोखीम कमी करण्याची सुविधा प्रदान करते. यामुळे जीवित व वित्तहानी कमी होण्यास मदत होते.

ही प्रणाली IMD, CWC, INCOIS, DGRE, IC-R, ICMR यासारख्या अलर्ट जनरेटिंग एजन्सींना राष्ट्रीय स्तरावरील समान व्यासपीठावर एकत्रित करते. सदर प्रणाली तंत्रज्ञान सिद्धता व पायलट प्रोजेक्ट अंतर्गत तामिळनाडू राज्यात १ वर्षाहून अधिक काळ कार्यरत आहे. C-P - सचेत, प्रकल्पाची संपूर्ण भारतात अंमलबजावणी करण्यासाठी NDM- आणि उ-ऊजढ यांच्यात २३ ऑगस्ट २०२१ रोजी सामंजस्य करार झाला आहे.

सद्यस्थितीत या प्रणालीचा पहिला टप्पा पूर्णतः कार्यान्वयित करण्यात आला असून सचेत प्रणालीच्या पहिल्या टप्पा अंतर्गत -irtel, Reliance गळे, तेवरषेपश-खवशर, MTNL,BSNL या मार्फत स्थान आधारित मेसेज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याद्वारे जास्तीत जास्त नागरिकांना कमीत कमी कालवधीत आपत्तीबाबत पूर्वसूचना देणे शक्य झाले आहे. याचा वापर सामान्य व्यक्ती तसेच मच्छिमार यांना सूचना देण्यासाठी होऊ शकतो. प्राथमिक स्तरावरील पारंपारिक मोबाईल नेटवर्कचा उपयोग करून या प्रणालीचा वापर करता येतो, हा या प्रणालीचा सर्वात मोठा फायदा आहे.

'सचेत' या प्रणालीच्या पुढील टप्प्यात Cell Broadcast म्हणजे मोबाईलवर व्हॉइस संदेश पाठवणे तसेच रेडीओच्या माध्यमातून संदेश प्रसारित करणे, ढ.त च्या माध्यमातून नागरिकांना संदेश देणे तसेच भारतीय रेल्वेच्या प्रवासी माहिती उद्घोषण प्रणालीद्वारे संदेश प्रसारित करणे अशा प्रकारची यंत्रणा विकसित करण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी (प्रणाली देखभाल खर्च) पुढील १० वर्षाकरिता येणारा खर्च हा NDMA द्वारे केला जाणार असल्याने राज्य व केंद्रशासित प्रदेशांवर याचा आर्थिक भार पडणार नाही.

भारत सरकार, दूरसंचार विभाग यांनी सन २०२० मध्ये काढलेल्या परिपत्रकानुसार आपत्ती दरम्यान अथवा आपत्ती प्रवण भागात सबंधित प्राधिकरणाच्या निर्देशानुसार पाठवण्यात येणाऱ्या SMS अथवा Cell Broadcast याकरिता कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. आपत्ती व्यतिरिक्त कारणासाठी सदर प्रणालीचा वापर केल्यास त्यासाठी येणारा खर्च भारतीय दूरसंचार विनियामक प्राधिकरण व भारतीय दूरसंचार विभाग यांनी निर्धारित केलेल्या दरानुसार राज्य / केंद्रशासित प्रदेश यांना करावा लागेल.

**CAP-इंटिग्रेटेड अलर्ट सिस्टमची वैशिष्ट्ये**

CAP-इंटिग्रेटेड अलर्ट सिस्टम आपत्ती सूचना माहितीच्या देवाणघेवाणीसाठी जागतिक स्तरावर स्वीकृत ITU-T x.१३०३ CAP मानक आधारित प्रणाली असून या प्रणालीचा मुळ उद्देश सर्व एजन्सींना एका छत्राखाली आणणे आणि माहिती देवाण-घेवाणीमध्ये वाया जाणारा मौल्यवान वेळ वाचवणे हा आहे. या प्रणालीच्या माध्यमातून कोणत्याही धोक्यासाठी सर्व संभाव्य प्रसार पद्धतीचा वापर करून नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविणे शक्य आहे. राज्यात शहरापासून ते गावापर्यंत मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने 'सचेत' प्रणालीचा वापर करून कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त लोकांपर्यंत संदेश पोहचविणे शक्य आहे.

या प्रणालीद्वारे प्रभावित क्षेत्रातील स्थानिक लोकसंख्येव्यतिरिक्त हंगामी किंवा पर्यटन लोकसंख्येला देखील समाविष्ट करून संदेश किंवा माहिती पोहोचविणे शक्य आहे. या प्रणालीचा वापर करून विशिष्ट भौगोलिक भागातील लोकसंख्येला विशिष्ट संदेश पोहोचविणे शक्य आहे. यामुळे त्याची उपयोगिता आणि प्रभावीपणा वाढण्यास मदत होते. स्थानिक जनतेला संदेशाचे अवलोकन करता यावे यासाठी स्थानिक भाषेत संदेश पाठवण्याची सुविधा उपलब्ध आहे. दृष्टिहीन व्यक्तींना संदेश पोहोचविण्यासाठी ध्वनिमुद्रित संदेश पाठवण्याची सुविधा या प्रणालीत उपलब्ध आहे.

सचेत या एकाच यंत्रणेचा वापर करून पावसासंबंधी इशारे, पूर, चक्रीवादळ, संभाव्य भूस्खलन, त्सुनामी, गारपीठ, वीज पडणे, उष्णतेची लाट थंडीची लाट अशा वेगवेगळ्या आपत्ती प्रकारांबाबत वेगवेगळ्या प्रकारचे संदेश / सूचना देणे शक्य आहे. सर्व नागरिकांना आरोग्य विषयक सल्ले, कायदा व सुव्यवस्था याबाबत सूचना प्रसारित करणे तसेच मच्छिमारांना हवामान विषयक पूर्वसूचना देणे शक्य आहे. सर्व नागरिकांपर्यंत संदेश पोहोचवण्यासाठी सर्व TSP (दूरसंचार सेवा प्रदाता), मोबाईल अप्लिकेशन, सार्वजनिक संकेतस्थळे, इंटरनेट ब्राउजर नोटिफिकेशन, शासकीय सोशल मिडिया, T.V. रेडीओ, बस व रेल्वे यांची सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली तसेच GAGAN, IRNSS व NavIC या सारख्या भारतीय भौगोलिक स्थिती दर्शक प्रणाली या सारख्या बहुस्तरीय यंत्रणेचा वापर या प्रणालीद्वारे केला जाऊ शकतो. या यंत्रणेच्या गैरवापरास प्रतिबंध करण्यासाठी बहुस्तरीय सुरक्षित प्रमाणीकरण आणि विश्र्वसनीय उपकरण यंत्रणा विकसित करण्यात आली आहे.

आपत्ती व्यवस्थापनाकरिता 'सचेत' प्रणाली वापर पुढील प्रमाणे करता येऊ शकतो

अ) आपत्ती पूर्व वापर -

१. मुसळधार / अति मुसळधार पावसाचा इशारा देणे.

२. संभाव्य पुराबाबत इशारा देणे.

३. चक्रीवादळाबाबत इशारा देणे.

४. त्सुनामीबाबत धोक्याची सूचना देणे.

५. विजेपासून होणाऱ्या जीवितहानीबाबत पूर्वसूचना देणे.

६. मच्छिमार लोकांना हवामानाबाबत पूर्वसूचना देणे.

७. निवाराकेंद्र / स्थलांतर याबाबत सूचना देणे.

८. माहितीकरिता संपर्क क्रमांक प्रसारित करणे.

ब) आपत्ती दरम्यान वापर

१. आपत्तीबाबत अद्ययावत सूचना प्रसारित करणे.

२. सुरक्षित स्थळांची माहिती देणे.

३. आपत्ती दरम्यान 'काय करावे व काय करू नये' याबाबत सूचना देणे.

४. मदतीकरिता संपर्क क्रमांक प्रसारित करणे,

क) आपत्ती नंतर वापर

१. मदत व पुनर्वसन या संबंधित माहिती प्रसारित करणे.

२. पूर, भूकंप, भूस्खलन अथवा इतर कारणांनी बंद झालेले रस्ते, महामार्ग, घाटमार्ग, पूल यांची माहिती देणे.

लघुरूप

C-P : Common -lert Protocol

NDM-: National Disaster Management -uthority

IMD : Indian Metrological Department

CWC: Central Water Commission

INCOIS: Indian National Centre for Ocean Information Services

DGRE: Defence Geoinformatics Research Establishment

IC-R : Indian Council of -griculture Research

ICMR: Indian Council of Medical Research

C-DOT: Centre for Development of Telematics

SOP : Standard Operating Procedure

TSP: Telecom Service Provider

G-G-N: GPS -ided Geo -ugmented Navigation

NavIC: Navigation with Indian Constellation

IRNSS: Indian Regional Navigation Satellite System

**मुकुंद चिलवंत**
**जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग**

## नालीसाठी खोदलेल्या रस्त्यामुळे प्रभाग क्र. १७ मधील नागरिक बेजार, रहदारीला होत आहे अडथळा; नागरिकांनी आयुक्तांना दिले निवेदन

लातूर : अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर प्रभागात झालेले रस्ते



भुयारी गटारी करण्यासाठी लातूर मनपा ने मध्ये भागातून खोदले आहेत. पावसाळा सुरू झाल्यामुळे प्रभागातील प्रत्येक रस्त्यावर चिखल होत आहे. यामुळे नागरिकांना ये-जा करण्यासाठी प्रचंड अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे महानगरपालिकेने खोदलेले रस्ते तात्काळ दुरुस्त करून उर्वरित कामे पावसाळ्यानंतर करावे अशा आशयाचे निवेदन लातूर शहर महानगरपालिका आयुक्तांना दिले आहे.

लातूर शहरातील प्रभाग क्रमांक १७ मधील एलआयसी कॉलनी, बलवा नगर, देशमुख नगर, रुद्रेश्र्वर नगर, विद्यानगर संत, ज्ञानेश्र्वर नगर या भागातील महानगरपालिकेने भुयारी गटारी व गॅस पाईपलाईन करण्यासाठी रस्त्याच्या मधोमध खोदकाम केले आहे. संपूर्ण रस्त्यावर माती व दगड पसरले आहेत, यातच पाऊस पडल्यामुळे प्रभागातील या भागातील रस्त्यावर झाला आहे. घराबाहेर निघणे देखील अडचणीचे झाले आहे. पावसाळा सुरु झाल्याने नागरिकांना अनेक समस्याचा सामना करावा लागत आहे.

यासार्व कारणामुळे लातूर शहर महानगरपालिकेने प्रभागात चालू असलेले काम तात्काळ थांबून रस्ता दुरुस्त करून द्यावा अशी मागणी आयुक्त यांना एका निवेदनाद्वारे केली आहे. यासोबतच रस्ता तातडीने दुरुस्ती न केल्यास निवेदनात दिला आहे.

निवेदनावर बाबासाहेब खुणे, सचिन सुरवसे, दत्तू अचूळे, लक्ष्मीबाई स्वामी, हिरकणा टिके, किशोर पवार, सिध्देश्र्वर धुमाळ, प्रवीण मताई, प्रा. शिवनगे, प्रदीप लांजजिले, सिद्राम देवकते, अनंत कुलकर्णी, चंद्रशेखर करपे, बालाजी जोशी, अरविंद धुमाळ, उमाकांत बिराजदार, बाळासाहेब जाधव, विजयकुमार कनसेट्टी, संजय पवार, संजय पांडे, शिवलिंग पाटील आदींची नावे आहेत.

## राहुल गांधींचे सव्वा सहा कोटींचे शेअर्स आज सव्वा नऊ कोटींचे झाले, किरीट सोमय्यांचा दावा!

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर गंभीर आरोप केले. एक्झिट पोलचे अंदाज व्यक्त केल्यानंतर शेअर बाजारात मोठा स्कॅम करण्यात आला, असे राहुल गांधी म्हणाले होते. दरम्यान भाजपचे नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी राहुल गांधी यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधींच्या २०२३ सालचे सव्वा सहा कोटींचे शेअर्स आज सव्वा नऊ कोटी झाले, असे सोमय्या म्हणाले.

किरीट सोमय्या नेमके काय म्हणाले?

देशभरात २२ लाख लोकांनी २२ कोटी रुपये म्यूच्यूअल फंडात गुंतवलेले आहेत. या वर्षाच्या मे महिन्यात म्यूच्यूअल फंडम ध्ये एका महिन्यातील सर्वाधिक गुंतवणूक करण्यात आली. याला राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे शेअर बाजाराचा घोटाळा म्हणणार का? २०२३ साली राहुल गांधी यांच्या शेअर्सची किंमत ही सव्वा सहा कोटी रुपये होती. आता याच सव्वा सहा कोटींचे आता सव्वा नऊ कोटी झाले आहेत. उद्धव ठाकरे यांच्या शेअर्सचे मूल्य ४० टक्क्यांनी वाढलेले आहे, असा दावा सोमय्या यांनी केला. तसेच देशातील १६ कोटी डी-मॅट अकाऊंट होल्डर, छोट्या गुंतवणूकदारांना राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे घोटाळा म्हणत असतील तर देव त्यांन क्षमा करो, असा टोलादेखील सोमय्या यांनी लगावला.

राहुल गांधी यांनी नेमका काय आरोप केला?

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप केले. मोदी आणि अमित शाह यांनी निवडणुकीदरम्यान गुंतवणुकीचा सल्ला का दिला? गुंतवणुकीचा सल्ला देणे हे त्यांचे काम आहे का? भांडवली बाजारांम ध्ये फेरफार केल्याप्रकरणी सेबीमार्फत चौकशी सुरू असलेल्या व्यक्तीच्या मालकीच्या माध्यमाला दोघांनी दिलेल्या मुलाखतीत त्यांनी गुंतवणुकीचा सल्ला दिला. याच सल्ल्यामुळे निवडणुकीच्या निकालानंतर गुंतवणुकदारांचे शेअर बाजारात ३० लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले, असा दावा राहुल गांधी यांनी केला. राहुल गांधी यांच्या या सल्ल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

भाजपने राहुल गांधी यांचा हा आरोप फेटाळला आहे. त्यांच्या आरोपांवर भाजपचे नेते पियुष गोयल यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नरेंद्र मोदी भारताला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी मेहनत घेत आहेत. असे असताना राहुल गांधी वरील आरोप करून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करत आहेत, असे पियुष गोयल म्हणाले.

## सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा विलास सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाच्या वतीने सत्कार

**खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या विजयाचा केला आनंद साजरा**

लातूर प्रतिनिधी : लातूर लोकसभा निवडणुक नुकतीच पार पडली आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून डॉ. शिवाजी काळगे हे ६२ हजार मतांनी विजयी झाले आहेत. मराठवाडयासह महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळाले आहे. यामध्ये काँग्रेसचे जेष्ठ नेते राज्याचे सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनात, राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांनी मोलाचे योगदान दिले आहे. या बददल विलास कारखाना संचालक मंडळाने आनंद व्यक्त करून राज्याचे सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा सत्कार केला.

विलास सहकारी साखर कारखान्याच्या सर्व संचालकांनी मंगळवार दि. ११ जून रोजी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची आशियाना निवासस्थानी भेट घेऊन व्हा.चेअरमन रविंद्र काळे आणि संचालकांनी आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांचा सत्कार केला.

यावेळी माजी आमदार त्र्यबंक भिसे, व्हा. चेअरमन रविंद्र काळे, संचालक सर्वश्री अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, रंजीत पाटील, गोविंद डुरे, सुभाष माने, संजय पाटील खंडापूरकर, ज्ञानोबा पडीले, तालुका काँग्रेस अध्यक्ष सुभाष घोडके आदी उपस्थित होते.

## उपदेशकथा

### शहरी आणि खेडवळ

एका शेतातल्या उंदराने शहरवासी मित्राला आपल्या घरी जेवायला बोलविले. शहरी मित्राने कुतूहलाने ते आमंत्रण स्वीकारले पण जेवणाचे पदार्थ म्हणजे नुसती धान्येच होती. ते पाहून शहरी उंदीर म्हणाला, 'मित्रा, तू अगदी साध्या किड्यामुंगीसारखा जगतोस असं दिसतं. तू आता माझ्याबरोबर शहराकडे चल. तिथं सगळे चांगले पदार्थ आहेत. आपण दोघं मिळून ते खात जाऊ.'

त्याप्रमाणे ताबडतोब ते दोघे शहरात गेले. शहरी उंदराने त्या खेडवळ उंदराला पाव, खवा, सुकामेवा, शेंगा, साखर आणि फळफळावळ दाखविली. ते पाहून खेडवळ उंदीर अगदी दीपून गेला. त्याने आपल्या मित्राच्या भाग्याची स्तुती केली आणि स्वतःच्या कमनशिबाबद्दल त्याला वाईट वाटले. ते जेवायला सुरुवात करणार इतक्यात दार वाजले. त्याबरोबर ते दोन छोटे जीव इतके घाबरले की ते एका फटीत लपले. जरा वेळाने ते परत सुक्यामेव्याला तोंड लावणार तोच पुन्हा दुसरे कोणीतरी त्या खोलीत आले आणि पुन्हा ते दोघेजण जीव घेऊन आपल्या बिळात शिरले. मग मात्र उपाशी राहावे लागले तरी चालेल पण आपलंच घर बरं असा त्या खेडवळ उंदराने निश्चय केला. 'राम राम मित्रा!' तो उसासा टाकून म्हणाला, 'मला आपलं माझं ते कच्चं धान्यच बरं वाटतं.

कथा उपदेश : भीतीयुक्त श्रीमंती जीवनापेक्षा शांततामय आणि साधे गरिबी जीवन चांगले.

## (गुरु वचन)

### कुशल मार्गदर्शन

एका प्रयोगशाळेत काही विद्यार्थी प्रयोग करत होते. यावेळी दोन विद्यार्थ्यांकडून मोठी चूक झाली. त्यांना वाटले की, आता त्यांना कठोर शिक्षा मिळेल. प्रयोगशाळा त्यावेळी प्रसिद्ध वैज्ञानिकाने काही दिवसांपूर्वीच सुरु केली होती. दोन्ही विद्यार्थी घाबरत-घाबरत त्यांच्याजवळ गेले. वैज्ञानिकाने त्यांना घाबरलेले पाहून विचारले, काय झाले? यावर एक विद्यार्थी घाबरत-घाबरत म्हणाला, सर इलेक्ट्रिक मिटर खराब झाले आहे. यामुळे त्याच्यात खूप जास्त करंट पसरला आहे. हे ऐकून वैज्ञानिक सुन्न झाला. नंतर त्याने स्वतःला सावरले आणि म्हणाला, अरे फक्त एवढ्या छोट्या गोष्टीसाठी तुम्ही दोघे एवढे परेशान आहात. विद्यार्थी जेव्हा प्रयोग करतात तेव्हा अशा गोष्टी घडतच असतात. जर विद्यार्थ्यांनी चूका केल्या नाहीत तर ते शिकतील कसे? परंतु भविष्यात प्रयोग करताना मात्र अवश्य सावधानी बाळगायला हवी. ज्यामुळे अशा प्रसंगापासून वाचता येईल. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकाचे म्हणणे ऐकूल्यानंतर वैज्ञानिकाप्रती त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. तथापि, जी चूक या दोन्ही विद्यार्थ्यांकडून झाली होती. त्यामुळे एका खूप महागडे आणि महत्त्वाचे यंत्र पूर्णपणे जळाले होते आणि ते यंत्र सध्या बाजारात उपलब्ध नव्हते. एवढेच नव्हे तर ते यंत्र जळाल्यामुळे अनेक महत्त्वपूर्ण प्रयोगही थांबले होते. परंतु वैज्ञानिक या नुकसानावर न चिडले न त्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांवर राग व्यक्त केला. तर दोन्ही विद्यार्थ्यांना भयमुक्त केले. त्यानंतर ज्यांनीही हा प्रसंग ऐकला. त्यांनी वैज्ञानिकाची स्तुती केली.

### रेणा नदी काठावरील गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा

लातूर, : जिल्ह्यात १० जून २०२४ रोजी रात्री झालेल्या पावसामुळे रेणा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. रेणा नदीवरील घनसरगाव, रेणापूर, जवळगा व खरोळा बंधारा येथील पाणीपातळी पूर्ण संचय पातळीच्यावर गेली आहे. त्यामुळे रेणा नदी काठावरील गावांमध्ये पुर परिस्थिती निर्माण होऊ शकते.

हवामान केंद्राद्वारे मुसळधार पावसाचा इशारा प्राप्त झाला आहे. अशा परिस्थितीत रेणा नदी काठावरील गावातील नागरीक, शेतकरी किंवा नदीकाठी वस्ती करून राहिलेले नागरिक यांना लघु पाटबंधारे विभागाच्यावतीने सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

# कृषी विभागाच्या कल्याणकारी योजना

*विविध पिकांच्या संकरीत वाण निर्मितीमुळे देशांत हरितक्रांतीचा पाया घातला गेला. यानंतरच्या काळातील पंचवार्षिक योजनांद्वारे शेती विकासावर विशेष भर देण्यात आला. कृषी विद्यापीठातील सुधारीत तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यत पोचवण्यासाठी आखलेल्या पीक प्रात्यक्षीके, प्रक्षेत्र भेटी, कृषी तंत्रज्ञान प्रचारसभा, चर्चासत्रे, मेळावे, प्रदर्शने इत्यादी कार्यक्रमांच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे कृषी उत्पादनवाढीमध्यें मोलाची भर पडली. या मुळे आपण अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्ण झालो असलो तरी अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता हे कृषी विभागाचे एकमेव उद्दीष्ट नसून शेतकऱ्यांना उपलब्ध संसाधनांचा परिपूर्ण वापर करुन अधिकाधिक आर्थिक फायदा मिळवून देणे हे सुद्धा नितांत गरजेचे आहे. यासाठी व्यापारक्षम शेतीची कास धरावी लागेल. मुक्त आर्थिक व्यवस्था व जागतीक व्यापार व्यवस्थेचा फायदा करुन घेण्याच्या दृष्टिने कृषी, फलोत्पादन व जलसंधारण क्षेत्रात कृषी उत्पादन वाढ, निर्यातवृध्दी व कृषि प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या अनेकविध योजना कृषी विभागामार्फत राबविण्यांत येत आहेत.*



शेतीव्यवसायातून स्वयंपूर्णतेबरोबरच आर्थिक उन्नती साधणे व जागतीक शेतमालाच्या बाजारपेठेत महत्वाचे स्थान मिळविणे या निर्धाराने कृषी विभागाची वाटचाल सुरु आहे. महाराष्ट्र शासन राबवत असलेल्या महत्वाकांक्षी योजना हा या धोरणाचाच भाग आहेत. आधुनिक कृषीतंत्राच्या वापरासाठी शेतकरी हा केंद्रबिंदू मानून आवश्यक त्या सर्व संसाधनांचा योग्य वापर करण्याच्या दृष्टिने मार्गदर्शन करणारी एकच यंत्रणा असावी यादृष्टिने कृषि विभागाची रचना करण्यांत आलेली आहे. त्या द्वारे कृषी तंत्रज्ञान थेट शेतक-यांपर्यत पोहोचविणे सुलभ झाले आहे.

केंद्र व राज्य शासन कृषी क्षेत्रातील विकासासंदर्भात विविध योजना राबावत आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे शेती उत्पादन वाढण्यासाठी,पिकांचे संरक्षण आणि त्यांची जोपासना करण्यासाठी, पिकांवरील आलेली कीड नियंत्रण करण्यासाठीचे कार्यक्रम आणि,राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत व्यापारी पिकांसाठी असलेल्या योजना यांचा यामध्ये समावेश आहे. सिंचनाच्या चांगल्या सोयी उपलब्ध झाल्यामुळे शेती आणखी फायद्यात आणणे ही येणाऱ्या काळासाठी तितकेच गरजेचे आहे. हा संपूर्ण विचार करता त्यासाठी जिल्ह्यातील कृषी विभागामार्फत अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहे.

पंतप्रधान पीक विमा योजना

केंद्र शासनाने सुरु केलेली पंतप्रधान पीक विमा योजना शेतक-यासाठी अत्यंत उपयुक्त आणि फलदायी असून या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्याने फक्त १ रुपया भरुन आपले नाव नोंद करायचे आहे. विमा हप्त्याची रक्कम ही केंद्र शासन भरणार आहे. शेतकऱ्याने आपल्या आधार कार्डची प्रत, ७/१२ उतारा, बँक पासबूक झेरॉक्स, पीक पेरणी स्वयंघोषणा पत्र घेऊन आपल्या जिल्ह्यातील किंवा आपल्या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन नाव नोंदणी करावी हे सर्व केल्यानंतर त्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.अवकाळी झालेली अतिवृष्टी अथवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे जमीन नापेर राहिल्यास त्या क्षेत्रालाही विमा संरक्षण मिळण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली आहे.

अन्न आणि पोषण सुरक्षा : अन्नधान्य पिके (पूर्वीचे NFSM) ( भात, कडधान्य, भरडधान्य (मका), पौष्टिक तृणधान्य व TRFA कडधान्य ) या योजनेंतर्गत भात, कडधान्य, भरडधान्य ( मका ) व पौष्टिक तृणधान्य (ज्वारी, बाजरी, नागली, इ. पिकांची पीक प्रात्याक्षिके राबविली जातात अन्नधान्य पीक क्षेत्र विस्तार व उत्पादकतेमध्ये वाढ करून शेतकऱ्यांच्या उत्पादनात शाश्वत वाढ करणे, जमिनीची सुपीकता व उत्पादन क्षमता वाढविणे.,शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे. हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

कृषी यांत्रिकीकरण – शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे.,पीक रचने नुसार गरजेनुरुप व मागणी प्रमाणे पूर्वतपासणी केलेली दर्जेदार कृषीऔजारे शेतक-यांना अनुदानावर उपलब्ध करुन देणे.व कृषी उत्पादन प्रक्रियेत अद्ययावत यंत्रसामुग्रीच्या वापरासाठी प्रोत्साहीत करणे. हे प्रमुख उद्देश साध्य करण्यासाठी जिल्ह्यामध्ये कृषी यांत्रिकीकरण योजना राबविण्यात येत आहे ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि ट्रॅक्टर सोबत चालणारी औजारे, ठिबक आणि तुषार सिंचन सेट, शेडनेट, पॉली हाऊस, कांदाचाळ,प्लास्टिक मल्चिंग इत्यादी गोष्टींसाठी अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यास त्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. महाडीबीटी पोर्टल– https://mahadbt.maharashtra.gov.in

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी या योजनेंतर्गत , गांडूळ खत युनिट, बांबू लागवड,फळबाग लागवड,नाडेप कंपोस्ट युनिट बनवणे, इतर लाभ दिले जातात.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम योजनेतंर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक शेतजमीनीवर फळबाग लागवड करता येते.

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना – शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे., पीक रचनेत बदल घडवून आणणे. व प्रक्रीया उद्योगांसाठी आवश्यक कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे. हे प्रमुख उद्देश साध्य करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना राबविण्यात येत आहे. जे शेतकरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकत नाहीत असे शेतकरी जास्तीत जास्त ६ हेक्टर क्षेत्र मर्यादेत या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)

सोयाबीन, कापूस, ,हरभरा, भात,मका, ज्वारी व ऊस या महत्वांच्या प्रमुख पिकांवर वारंवार तसेच आकस्मिकरीत्या उद्भवणाऱ्या कीड रोगांच्या प्रादुर्भावामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान व त्यामुळे उत्पादनात होणारी घट लक्षात घेता यासाठी कीड व रोग सर्वेक्षण , सल्ला, जन जागृती व व्यवस्थापन याबाबतची शाश्वत यंत्रणा तयार करण्याच्या दृष्टीने पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (CROPSAP) राबविण्यात येत आहे. . शेतकऱ्यांमध्ये कीड व रोगांची ओळख निर्माण करणे, त्यांना प्रशिक्षित करुन कीड रोगांचे वेळीच व्यवस्थापन करणे., कीड रोगांच्या प्रादुर्भावाबाबत जागरूकता निर्माण करणे व पुढील संभाव्य नुकसान टाळून उत्पादनात वाढ करणे. पिकांचे सर्वेक्षण करून हंगाम निहाय प्रमुख कीड रोगांच्या प्रादूर्भावाबाबत शेतकरी यांचेमध्ये जाणीव निर्माण करणे व त्यांना वेळीच उपाययोजना सुचविणेसाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शेतक-यांसाठी कृषी विभागामार्फत ऊस सुपर केन नर्सरी प्रात्याक्षिके , हुमणी नियंत्रणासाठी प्रकाश सापळे उभारणी, बीज प्रक्रिया प्रात्याक्षिके, फलोत्पादन यांत्रिकीकरण , प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना – प्रती थेंब अधिक पीक, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, काढणीपश्र्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्प उभारणी ,केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकी करण उप अभियान, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान– अन्नधान्य पिके ,एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान क्षेत्र विस्तार , सामूहिक शेततळे (राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत),कांदाचाळ उभारणी, आत्मनिर्भर भारत पॅकेजअंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना (झचऋए), कृषि पायाभूत सुविधा योजना, शेतकरी मासिक, महा–डीबीटी, राष्ट्रीय शाश्र्वत शेती अभियान अंतर्गत– मृद आरोग्य पत्रिका योजना प्रशिक्षणासह प्रात्यक्षिक कार्यक्रम ,परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती), डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन , राष्ट्रीय शाश्र्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती) ,जमीन आरोग्य पत्रिका कार्यक्रम, कृषी विभागामार्फत दिले जाणारे विविध कृषी पुरस्कार (राज्य पुरस्कृत योजना) अशा विविध योजना व उपक्रम जिल्हांमध्ये राबविण्यात येत आहेत. कृषी विभागाच्या योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, योजनांबाबत अधिक माहितीसाठी स्थानिक पातळीवरील कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा.

oooooo

**जिल्हा माहिती कार्यालय, सातारा**

# सेवाव्रती डॉ. महेश देवधर यांचा अमृतमहोत्सव उत्साहात साजरा

**विवेकानंद रुग्णालय आजही सुसंस्कारीत स्वास्थ्य सेवेचे केंद्र आहे : डॉ. अशोकराव कुकडे**

लातूर : विवेकानंद रुग्णालय हे आजही सुसंस्कारीत स्वास्थ्य सेवेचे केंद्र आहे, हे संस्काराचे फलित असल्याचे प्रतिपादन विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक पद्मभूषण डॉ.अशोकराव कुकडे काका यांनी केले. मातोश्री वृद्धाश्रम परिसरात झालेल्या या कार्यक्रमात ' विवेकानंद वार्ता ' या त्रैमासिकाच्या विशेषांकाचे विमोचनही करण्यात आले.

विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक विश्र्वस्त डॉ. महेश मोरेश्र्वर देवधर यांचा अमृत महोत्सव नुकताच पद्मभूषण डॉ. कुकडे काका, पुण्याचे माजी खासदार प्रदीप रावत, ज्येष्ठ विधिज्ञ शरदराव चंद्रचूड आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच मातोश्री वृध्दाश्रम येथे साजरा करण्यात आला. डॉ.देवधर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मातोश्री वृद्धाश्रम परिसरातील नवीन इमारतीतील ' श्रीराम सभागृह' चे उद्घाटनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. कुकडे म्हणाले की, डॉ. महेश देवधर यांचे सेवेसाठी समर्पित असलेले जीवन भावी पिढीसाठी निश्र्चितच पथदर्शक व मोलाचे शिक्षण देणारे आहे. सेवा करताना स्थळ, वेळ, आकारमान यापेक्षा तुमच्या भावना सर्वाधिक महत्वाच्या असतात, असेही डॉ. कुकडे म्हणाले. शरदराव चंद्रचूड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना १९७५– ७६ च्या काळात लातूरसारख्या दुर्गम भागात वैद्यकीय सेवा देण्याचा डॉ. महेश देवधर यांचा निर्णय भावूक असू शकतो. पण आयुष्यभर समर्पित निष्काम सेवा देण्याचे दुर्मिळ काम त्यांनी केले, ही बाब सर्वांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.




माजी खासदार प्रदीप रावत यांनी यावेळी बोलताना डॉ. कुकडे काकांसारखा दीपस्तंभ, डॉ. देवधरांसारखा जीवनव्रती यांचा समर्पित सेवाभाव, तत्वनिष्ठा , प्रामाणिकता या सर्वांचे मूळ संघ संस्कारात असल्याचे सांगितले. आजचा प्रगतीशीलपुरोगामी हिंदू समाज हा प्रबोधन युगाची देणगी आहे. समाजात हिमालयाएवढ्या उंचीची माणसे शतकातून कधीतरी जन्माला येतात. पण त्यांच्या जीवावर समाज वर्धिष्णू होत नाही. त्याकरिता सामान्य माणसांचे सशक्तीकरण करावेच लागते. सर्वसामान्य माणसात असामान्य कार्य करण्याची शक्ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघ निर्माण करते याचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

डॉ. देवधर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आपल्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून झालेल्या सेवेच्या संस्कारामुळे आपण आयुष्यभर हे कार्य अत्यंत निष्ठापूर्वक करू शकलो, असे सांगितले. अशाच प्रकारचे संस्कार पुढील पिढ्यांवरही व्हावेत अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अरुणा देवधर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## इतिहासात आजचा दिवस

अंतरराष्ट्रीय

१४१८ – पॅरिसमध्ये उठाव, बरगंडीने शहर काबीज केले.

१६५३ – गॅबार्डची लढाई.

१७५९ – ॲबनर डबलडे याने नवा खेळ शोधला. त्याचे नाव बेसबॉल. आज हा खेळ संयुक्त संस्थानांचा (अमेरिका) राष्ट्रीय खेळ बनला आहे.

१७७५ – इंग्लंडने अमेरिकेच्या मॅसेच्युसेटस राज्यातील बंड मोडून काढण्यासाठी लश्करी कायदा लागू केला.

१९३० – जर्मनीचा मॅक्स श्मेलिंग जागतिक हेवीवेट चॅम्पियन बनला. प्रतिस्पर्ध्याला चुकीचे खेळल्यामुळे फाऊल केल्याने रिंगणातून बाहेर काढले गेल्यानंतर जागतिक स्पर्धा जिंकलेला तो एकमेव मुष्टियोद्धा आहे.

१९४४ – पहिला फ्लाइंग बॉम्ब इंग्लंडवर आदळला. युद्धात प्रथमच आधुनिक क्षेपणास्त्राचा वापर.

राष्ट्रीय

१९०५ – गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली.

१९७४ – रेल्वे संपात भाग घेतल्याबद्दल नऊ हजार कर्मचारी बडतर्फ.

१९७५ – इंदिरा गांधींची निवडणूक अलाहाबाद उच्च न्यायालयाने रद्द ठरविली. पुढची सहा वर्षे निवडणूक लढविण्यास मनाई.

१९७५ – नेल्सन मंडेला यांना आजन्म कारावासाची शिक्षा. रॉबिन बेटावर रवानगी.

१९९६ – भारताचे पंतप्रधान श्री.एच.डी.देवेगौडा यांच्या संयुक्त आघाडी सरकारने लोकसभेत बहुमत सिध्द केले.

२००७ – नागरकोइल हावडा सुपर फास्ट एक्सप्रेस (२६५९ डाउन) चे १४ डबे डुवाडाजवळ रुळावरुन घसरल्याने तीन जण ठार व २२ जण जखमी झाले.

२००८ – सतत नाविन्यपूर्ण चित्रपटांमुळे चर्चेत राहिलेल्या मधुर भांडारकरने तीन वेळा उत्कृष्ट चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळवून हॅटट्रिक साधली.

२००८ – लातूर येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे रुपांतर प्रादेश्कि परिवहन कार्यालयात करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जन्म

०४७६ – भारतीय गणिती आणि खगोलशास्त्रज्ञ पहिल्या आर्यभट्टाचा जन्म.

१८९४ – पुरुषोत्तम विश्वनाथ बापट, पाली भाषा कोविद; बौद्ध धर्म ग्रंथांचे भाषांतरकार आणि संपादकाचा जन्म.

१८९७ – ब्रिटेनचे माजी पंतप्रधान सर एंथिनी ईडन यांचा जन्म.

१९२४ – जॉर्ज एच. डब्ल्यु. बुश , अमेरिकेचे ४१वे अध्यक्षाचा जन्म.

निधन

१९६४ – कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, मराठी भाषेचे गाढे अभ्यासक यांचे निधन.

१९७२ – महात्मा गांधींचे आठ खंडांचे चरित्र लिहिणारे जी.डी. तेंडुलकर यांचे निधन.

१९७५ – स्वातंत्र्योत्तर काळातील एक मुत्सद्दी व उपाध्यक्ष–नियोजन आयोग दुर्गाप्रसाद धर यांचे निधन.

२००० – पु. ल. देशपांडे, मराठी मनावर दीर्घ काळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे लेखक, कवी, नाटककार, अभिनेता (चित्रपट, रंगभूमी), दिग्दर्शक, निर्माता, संगीतकार यांचे निधन.

२००१ – विनोदी लेखिका शकुंतला बोरगावकरचे निधन.

## त्यांच्या वाणीतून....

गेल्या पाच वर्षात दोन व्यक्तींनी सरकार चालवले. त्यांनी देशाचा व्यापक विचार केला नाही. मात्र, सुदैवाने देशातील जनतेने याची नोंद घेऊन त्याप्रकारे मतदान केले. एक–दोन लोकांच्या हातात अधिकार होते. त्याला मर्यादा आणण्यात आल्या. मात्र, असे असले तरी अद्यापही सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले नाही. पण त्याची प्रक्रिया आता सुरू झालीय. तसंच लवकरच या घडामोडी संपूर्ण देशाला बघायला मिळतील.

– राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार

आगामी विधानसभेत राष्ट्रवादीला ८० जागा मिळायला हव्यात, असं बोललो होतो. त्यानंतर माझ्या विरोधात अनेकजण बोलले. अशाप्रकारे काही बोलू नका, असे मला सांगण्यात आलं. मात्र, माझ्या मते जागावाटपाचे गुहाळ शेवटपर्यंत चालवून त्याचा फायदा आपल्याला होणार नाही. जागावाटपापबाबत लवकर निर्णय घ्यायला हवा, आधी जागा वाटप करून घ्यावे लागेल, त्यानंतर उमेदवार ठरवता येईल.

– अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ

## राशी भविष्य १२ जून २०२४

मेष : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व

नवविवाहित महिलांच्या इच्छा पूर्ण होतील. संसारातील अडचणीचे निवारण होईल. वृद्धांना रक्तदाबाचा त्रास होईल.

वृषभ : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम

सध्या नशीब अनुकूल होण्याचे दिवस आहेत. पोलिस, मिलिटरी इ. संरक्षण दलाशी संबंधितांना एखादी चांगली संधी मिळेल.

मिथुन : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व

आपली विजयी घोडदौड चालूच असली तरी त्याचा वेग आपल्याच काही चुकांमुळे मंदावणार नाही याची काळजी घेणे हितकारक ठरेल.

कर्क : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पूर्व

तरुण मुला–मुलींनी हाती घेतलेली कामे रेंगाळतील. धाडसी वृत्ती टाळा. झटपट निर्णय घेऊ नका.

सिंह : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व

उल्हासदायक वातावरणाचा आपल्या मनावरील ताण कमी करायला मदत मिळेल. तब्येत मनासारखी साथ देईल.

कन्या : शुभ रंग:काळा,शुभ दिशा:पूर्व

पत्रव्यवहारातून एखादी गोड बातमी ऐकावयास मिळेल. त्यानिमित्ताने प्रवासाचे आयोजन कराल.

तुळ : शुभ रंग:जांभळा,शुभ दिशा:दक्षिण

आई–वडिलांविषयी चिंता निर्माण होईल. जुनी येणी वसूल होतील. काहींना पोटाचे विकार त्रास देतील.

वृश्चिक :शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:दक्षिण

घर, वाहन खरेदी करू शकाल. बैठा व्यवसायात यश लाभेल. काहीजण मौजमजेसाठी प्रवास करतील.

धनु : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम

आपल्या यशाविषयी आणि मानसिक स्वास्थाविषयी सतत चिंता राहील. पूर्वनियोजित प्रवास असेल तरच करा.

मकर : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम

वास्तूबाबतचे निर्णय घेतले जातील. त्यात अपेक्षित यश मिळेल. विद्यार्थ्यांना शिक्षणात अपेक्षित यश मिळेल.

कुंभ : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम

महिलांना कौटुंबिक जीवनात थोडे कटू प्रसंगाला सामोरे जावे लागेल. एखाद्या जुन्या व्यवहारातून भांडणे होण्याची शक्यता.

मीन : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम

आर्थिक आघाडीवर समाधानी असाल. जे बेत मनाशी आखले असतील त्याची पूर्तता करण्याचा तुम्हाला ध्यास लागेल.

**मास्टर चावी ..**

जबाबदार हुद्याची
असे आगळी खुबी
सगळ्या कुलूपाची
सत्ता मास्टर चावी
प्रत्येक प्रश्र्नां उत्तर
असो हजरजबाबी
ही खुर्ची मिळे मज
पडते स्वप्न गुलाबी
दुरून डोंगर उत्तम
थाट सुंदर नबाबी
भोवतालचे भ्रामक
नशा त्याची शराबी
हुद्दा सांभाळणारा
हवायं मस्त मुरब्बी
दीर्घकालीन सुवास
अमोल अत्तरडब्बी
स्थान आहे हे असे
लगेचं चढते चरबी
लंगडा घोडा सुध्दा
जिंकेलं स्पर्धा डर्बी
हाती असता सत्ता
करालं मुस्कटदाबी
कुलूपे गळूनपडता
निरूपयोगी चाबी

२)
**वीकेंड ..**

एखाद तरी विकएंड
घालवा जेष्ठा समवेत
उबदार ती स्नेहमाया
बसायचे त्यांचे कवेत
जॉब सगळे एण्डलेस
रे प्रगतीच्या प्रतिक्षेत
वेळ जाईलं सरा सरा
हव्यासाच्या अपेक्षेत
कामातव्यस्त आपण
उडत राहे नीत हवेत
गेल्यावर आप्त मित्र
वाटते ते जवळ हवेत
वेळ द्यावा थोडा तरी
इतके त्यांनाअभिप्रेत
आयुष्यभर हवे ते ते
आपणा राहिरे ते देत
जवळ असूनि दुरावा
का व्हावे असे अपेत
घट्ट जितक्या मुठीत
निसटूनि जातात रेत
माहीत ना कधी कसा
येणार मृत्यूचा संकेत
आठवणी राहे जीवेत
अपेक्षा तशाचं अचेत

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## एलटीआर सॉफ्ट येथे कंपनीमध्ये निवड झालेल्या १२ विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार समारंभ संपन्न

लातूर : अंबाजोगाई रोड येथील एलटीआर सॉफ्ट मधील १२ विद्यार्थ्यांची निवड अग्रगण्य कंपन्यांमध्ये झाली आहे. या १२ विद्यार्थ्यांमधील समीक्षा भुतडा, स्मिरन गवते, वेदांत नोगजा, गणेश सागावे, किरण कडगंची, मेघना अरसुडे, ऋतुजा मडके यांची निवड टीसीएस या मल्टिनॅशनल कंपनी मध्ये झाली आहे. तसेच श्रद्धा मोरलावार व समीक्षा भुतडा यांची निवड मायक्रोलँड, धनराज बिरादार याची निवड विवाक्स टेकनॉलॉजि, सुलतान शेख याची निवड एस.के.बिट टेकनॉलॉजि, शेख हारून याची निवड टीचनुक या कंपनीत झाली आहे.

या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ दिनांक १० जून रोजी आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अमेरिका येथे अक्सेंचर या कंपनीत डेव्हलपर पदावर कार्यरत असलेले श्री शंकर बंग सर, अमेरिका येथे एसव्हीजी बँक येथे युएटी टेस्टर या पदावरती कार्यरत असलेल्या श्रीमती मंजुश्री बंग, टेकमहिन्द्रा पुणे येथे टेस्ट इंजिनियर या पदावरती कार्यरत असलेले श्री नितेश घोडके तसेच एल टी आर सॉफ्ट चे संस्थापक व संचालक श्री किशोर जेवे, एलटीआर सॉफ्टचे सहसंस्थापक व संचालक श्री अमोल कुंभार उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री अमोल कुंभार यांनी केले. त्यांनी एलटीआर सॉफ्ट मधील रिअल टाइम प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग ची माहिती दिली. प्रमुख पाहुणे श्री शंकर बंग यांनी आजच्या युगात टेकनॉलॉजि चे महत्व व अमेरिकेत त्यावर कसे काम होते यावर प्रकाश टाकला. श्रीमती मंजुश्री बंग यांनी अमेरिकेमधील बँकेमधील व्यवस्था व त्यामध्ये टेक्नॉलॉजि कशी काम करते ते सांगितले. श्री नितेश घोडके यांनी कंपनीकरिता कुठल्या कौशल्याची गरज आहे व त्याची तयारी कशी करावी यावर भर दिला. श्री किशोर जेवे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात एलटीआर सॉफ्ट आपल्या विध्यार्थ्यांना या टेक्नॉलॉजिच्या युगात जॉब रेडी च नाही तर उद्योजक बनवण्याच्या दृष्टीकोनातून कशी मदत करते हे सांगितले.

या प्रसंगी विध्यार्थी व पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच उपस्थित मान्यवरांनी विध्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्रातील चार केंद्रीय राज्यमंत्र्यांनी स्वीकारला पदभार






नवी दिल्ली : महाराष्ट्रातील चार केंद्रीय राज्यमंत्र्यांनी आज त्यांना सोपविण्यात आलेल्या खात्यांचा कार्यभार स्वीकारला. या मंत्र्यांमध्ये रामदास आठवले, प्रतापराव जाधव, श्रीमती रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांचा समावेश आहे.

रामदास आठवले यांनी सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या राज्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी सामाजिक न्याय क्षेत्रात नव्या संधी निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या राज्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताना त्यांनी औषधीय वनस्पती रोपण करून आरोग्य क्षेत्रात नव्या कल्पनांचा प्रारंभ केला.

श्रीमती रक्षा खडसे यांनी केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्या राज्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारला. महाराष्ट्रातील एकमेव महिला मंत्री आहेत.

मुरलीधर मोहोळ यांनी सहकार आणि नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या राज्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली. पदभार स्वीकारण्यापूर्वी त्यांनी मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. 'विकसित भारत' संकल्पनेच्या पूर्ततेसाठी सहकार मंत्रालय महत्त्वपूर्ण भूमिका निभावेल, असा विश्र्वास श्री. मोहोळ यांनी यावेळी व्यक्त केला.

# राम नाईक, राजदत्त, उदय देशपांडे, कुदंन व्यास सन्मानित; बाल पुरस्कार विजेता आदित्य विजय ब्राह्मणे मरणोपरांत सन्मानित

मुंबई, : यंदा प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर झालेल्या राज्यातील पद्म पुरस्कार विजेत्यांचा राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते राजभवन येथे सत्कार करण्यात आला.

वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्यावतीने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते उत्तरप्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक (पद्मभूषण), ज्येष्ठ चित्रपट निर्माते दिग्दर्शक राजदत्त (पद्मभूषण), 'मुंबई समाचार'चे अध्यक्ष होर्मुसजी कामा (पद्मभूषण), 'जन्मभूमी'चे संपादक कुंदन व्यास (पद्मभूषण), मल्लखांबचे प्रचारक व प्रशिक्षक उदय देशपांडे (पद्मश्री), ग्रामीण – आदिवासी भागात निःशुल्क नेत्रचिकित्सा देणारे डॉ. मनोहर डोळे (पद्मश्री), अंजुमन ई इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ. झहीर काझी (पद्मश्री) व नागपूर येथील मज्जाविकार तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांचा राज्यपालांच्या हस्ते शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

नंदुरबार येथील पिंप्राणी येथे नदीत पडलेल्या आपल्या भावांचे जीव वाचवल्यानंतर वीरमरण आलेल्या १२ वर्षाच्या आदित्य विजय ब्राह्मणे याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मरणोपरांत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. दिवंगत आदित्यच्या शौर्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते त्याच्या लहान भावाला यावेळी सन्मानित करण्यात आले.



कार्यक्रमाला वसंतराव नाईक प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र बारवाले, कार्याध्यक्ष अविनाश नाईक, आमदार निलय नाईक, आमदार इंद्रनील नाईक, विश्र्वस्त मुश्ताक अंतुले, दीपक पाटील व निमंत्रित उपस्थित होते.

# राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या मुख्यालय व प्रशिक्षण केंद्र स्थापनेच्या कामाला गती – मंत्री शंभुराज देसाई

मुंबई, : पश्र्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यात वारंवार उद्भवत असलेली पूर परिस्थिती, भूकंप प्रवण क्षेत्रात येत असलेला पाटण तालुका व रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याला बसत असलेला चक्रीवादळाचा फटका या आपत्तीजनक परिस्थितीमुळे राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे प्रशिक्षण केंद्र व मुख्यालय कोयनानगर येथे करण्यात येत आहे. कामाची निकड लक्षात घेता या कामाला यंत्रणांनी प्राधान्य देऊन गती द्यावी, असे निर्देश उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी काल दिले.



मंत्रालयात कोयनानगर, ता. पाटण, जि. सातारा येथे राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दलाचे मुख्यालय व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणेबाबत आयोजित आढावा बैठकीत मंत्री श्री. देसाई बोलत होते. बैठकीस अति. पोलीस महासंचालक अर्चना त्यागी, अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रवीण साळुंखे, अतिरिक्त पोलिस महासंचालक (प्रशिक्षण) राजकुमार व्हटकर, राज्य राखीव पोलीस दलाचे पोलिस उपमहानिरीक्षक अभिषेक त्रिमुखे, गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट, अवर सचिव नारायण माने, तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे साताऱ्याचे अप्पर जिल्हाधिकारी श्री. गलांडे, जिल्हा पोलीस अधिक्षक समीर शेख यांनी चर्चेत सहभाग घेतला.

केंद्रासाठी जमीन मिळून बराच कालावधी झाला असल्याचे सांगत मंत्री श्री. देसाई म्हणाले, या कामाचे अंदाजपत्रक तातडीने तयार करावे. पर्यावरणीय परवानग्यांचा प्रस्तावाचा संबंधित विभागाने पाठपुरावा करावा. या कामासाठी जिल्हास्तरावर जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी एक नोडल अधिकारी नियुक्त करावा. हे प्रशिक्षण केंद्र जागतिक दर्जाचे झाले पाहिजे. प्रशिक्षण केंद्राची निवडलेली जागा मौजे गोकुळ तर्फ हेळवाक (कोयनानगर) ही निसर्गरम्य व पर्यटनीय ठिकाण आहे. त्यामुळे प्रशिक्षण केंद्र पर्वतीय स्टेशनमधील इमारतीप्रमाणे करण्यात यावे. प्रशिक्षण केंद्राला पर्यटकांनीही भेटी दिल्या पाहिजे, अशा दर्जाचे बनविण्यात यावे, अशा सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

मंत्री श्री. देसाई पुढे म्हणाले, या केंद्रासाठी अंदाजपत्रक तयार करून निधी मागणी प्रस्ताव सादर करावा. पुढील दोन महिन्यात काम निविदा प्रक्रियेवर आणण्याची दक्षता घ्यावी. पोलीस गृहनिर्माण महामंडळाने आपल्या प्राधान्य क्रमाच्या यादीत या प्रकल्पाचा समावेश करावा. या प्रकल्पासाठी वास्तू विशारद नियुक्त करून विस्तृत प्रकल्प तयार अहवाल तयार करावा. स्थानिक प्रशासनाने राज्यस्तरावरील संबंधित विभाग, राज्य राखीव पोलीस दल यांच्याशी संमन्वय ठेवून काम गतीने पुढे न्यावे, अशाही सूचना केल्या.

## अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी विविध योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका) : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२४–२५ अंतर्गत फुलपिक लागवड, मशरुम उत्पादन, हरीतगृह, शेडनेट हाऊस, प्लॅस्टिक मल्चिंग, २० एचपी टॅक्टर, शेतकरी अभ्यास दौरा, सामूहिक शेततळे, वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण, कांदाचाळ, पॅक हाऊस व प्राथमिक प्रक्रिया केंद्र आदी बाबींचा लाभ देण्यात येणार आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव यांनी केले आहे.

ऑनलाईन अर्ज करताना महा–डीबीटी पोर्टलचे https://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login qH$dm https://mahadbtmahait.gov.in/ या संकेतस्थळावरील शेतकरी योजना हा पर्याय निवडावा. तसेच संगणक, लॅपटॉप, सामुदायिक सेवा केंद्र (सीएससी), ग्रामपंचायतीमधील संग्राम केंद्र इत्यादी माध्यमातून ऑनलाईन अर्ज करता येतील. पोर्टलवर अर्ज करण्यासाठी लागणारी सातबारा, आठ अ, बँक पासबुक व आधारकार्ड लिंक असलेला मोबाईल क्रमांक सोबत असणे आवश्यक आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. जाधव यांनी केले आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या कर्ज योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा

लातूर, (जिमाका) : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मांग, मातंग समाजातील व तत्सम १२ पोट जातीतील महिला, पुरुष घटकांची आर्थिक उन्नतीसाठी, तसेच त्यांना स्वंयरोजगाराच्या अधिकाअधिक संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने महामंडळामार्फत थेट कर्ज योजना (कर्ज मर्यादा एक लाख), तसेच केंद्र शासनाकडून पीएम अजय योजना राबविण्यात येते. या योजनांचे कर्ज प्रस्ताव अथवा अर्ज ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी www.lokshahir.in हे संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे. मातंग समाजातील गरजू शहरी, ग्रामीण भागातील महिला व पुरुष लाभार्थ्यांनी या कर्ज योजनांसाठी अर्ज करावे. तसेच लाभार्थ्यांने ु.श्रेझीहरहळी.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करुन एक प्रत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात सादर करावी, असे साहित्यरत्न लोकशाही अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी विंग, तळमजला, लातूर येथील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## केंद्रीय कृषी मंत्र्यांना देखील भेटणार – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे...

**(पान १ वरुन)** ...महत्वाच्या विषयावर मुख्यमंत्री स्वत: टास्क फोर्सचे अध्यक्ष झाले यावरुन राज्य सरकार या विषयी किती गंभीर याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी बोलताना कृषी मंत्री धनंजय मुंडे म्हणाले, विविध राज्ये पिकांची किमान आधारभूत किंमत किती असावी, याच्या शिफारशी केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे करतात. मात्र त्यात तफावती आल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते. त्यामुळे त्यात सुसूत्रता व एकवाक्यता आणणे गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र शासन पुढाकार घेत असून, त्यादृष्टीने आज आयोजित करण्यात आलेली परिषद अत्यंत महत्वाची आहे.

सर्वांनी मिळून समन्वयातून विविध पिकांच्या आधारभूत किमतींच्या शिफारशी एकत्रित व समसमान तसेच शेतकऱ्यांचा लाभ विचारात घेऊन केल्याने सर्व संबंधित राज्यांना फायदा होईल, असेही ते म्हणाले.

ही परिषद ऐतिहासिक ठरणार असून, रब्बी ज्वारीसाठी किमान आधारभूत किंमत देखील या परिषदेतील चर्चेतून केली जावी व त्यासंबंधीची कार्यवाही व शिफारस देखील शासनाला करावी, अशी सूचनाही धनंजय मुंडे यांनी केली आहे. तसेच ज्वारीच्या धर्तीवर वरई, नाचणी, राळा यांसारख्या आदिवासी क्षेत्रात घेतल्या जाणाऱ्या पौष्टिक तृण धान्यासाठी देखील किमान आधारभूत किंमत लागू करण्याबाबत विचार व्हावा, अशीही सूचना श्री. मुंडे यांनी केली आहे.

केंद्रीय कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा म्हणाले, आयोग शेती व शेतकरी हितासाठीच काम करेल. शेतमालाला योग्य मोबदला मिळेल तसेच कृषी मालाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. कृषी विस्तार यंत्रणा मजबूत करणे, खतांचा वापर कमी करणे, कृषी यांत्रिकीकरणावर भर देणे, खरीपामधील पिकांना देखील एमएसपीचा फायदा मिळवून देणे, खाजगी क्षेत्राची भागिदारी व गुंतवणूक वाढविणे यादृष्टीने आयोग काम करत असल्याचे सांगितले.

राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल म्हणाले, कृषी क्षेत्राला महत्त्व देणारे हे सरकार आहे. त्यामुळेच कृषी मूल्य आयोगाच्या इतिहासात पहिल्यांदाच असं घडत आहे की कृषी मूल्य आयोगाच्या किंमत विषयक धोरण ठरविण्याबाबतच्या बैठकीस राज्याचे मुख्यमंत्री आणि कृषी मंत्री उपस्थित राहिले आहेत. तृणधान्याचे महत्व लक्षात घेऊन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षे म्हणून साजरे केले आहे. तसेच तापमान वाढ कमी करण्यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात बांबू लागवड करण्यात येत आहे.राज्यातील शेतकऱ्यांना चांगले दिवस येण्यासाठी कृषी मूल्य आयोगाची भूमिका सकारात्मक राहील, असेही श्री. पटेल यावेळी म्हणाले.

केंद्रीय कृषी मूल्य आयोग – रब्बी हंगाम २०२५–२६ केंद्रीय कृषी आयोगाची किंमत विषयक धोरण ठरविण्याबाबत बैठक सह्याद्री अतिथी गृह येथे आयोजित केली होती. यावेळी कृषी मंत्री धनंजय मुंडे, आमदार भरत गोगावले, केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष विजय पॉल शर्मा, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चे प्रकल्प संचालक परिमल सिंह तसेच केंद्र आणि राज्य कृषी मुल्य आयोगाचे सदस्य आणि पश्र्चिम भारत समूहातील महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान,मध्य प्रदेश, गोवा व दमण राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडून विविध पिकांच्या किमान आधारभूत किमतींची शिफारस केंद्र शासनाला करण्यात येते आणि केंद्र शासन राष्ट्रीय स्तरावर आधारभूत किंमत योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्र्चित करून जाहीर करते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किंमती सर्व राज्यांना लागू होतात.

## उष्माघातामुळे मृत्युमुखी पडलेल्या व उपचार घेत असणाऱ्या रुग्णांना शासनाकडून मदतीचे निकष निश्र्चित करावेत – विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई : नैसर्गिक आपत्तीत वीज पडून मृत्यू झाल्यास



आपद्ग्रस्तांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात येते. त्याच धर्तीवर उष्माघाताने मृत रुग्णांनाही मदत मिळण्याबाबत नैसर्गिक आपत्तीचा निकष लावावा, जेणेकरून आपद्ग्रस्तांना आर्थिक मदत मिळेलृ, अशा सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या आहेत.

उष्माघातामुळे मृत्यू पावलेल्या नागरिकांची नोंद होत नाही त्यामुळे याबाबतचा आढावा शासन स्तरावून घेण्यात यावा. तसेच उष्माघाताने मृत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून आर्थिक मदतीची तरतूद नसल्याने आर्थिक मदत दिली जात नाही. त्यामुळे उष्माघातातील रुग्णांना मदतीबाबत निकष ठरविण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठित करावी, अशा सूचना उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या आहेत.

## राज्यातील पाणीटंचाईचा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडून आढावा

मुंबई, : राज्यातील धरणे तसेच तलावात अत्यल्प जलसाठा आहे. त्याचबरोबर राज्यातील काही भागात आजपर्यंत पर्जन्यमान अपुरे झालेले आहे, याअनुषंगाने पाणीटंचाई निवारणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनाबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी मंत्रालयात आढावा घेतला.

या बैठकीस पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, जल जीवन मिशनचे अभियान संचालक आर. रवींद्र तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री.पाटील म्हणाले, पाणी टंचाईच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने जलदगतीने कार्यवाही करावी. याबाबतचे कोणतेही प्रस्ताव प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. तीव्र पाणीटंचाई असलेल्या भागावर लक्ष केंद्रीत करून स्थानिक परिस्थितीनुसार जिल्हाधिकारी यांनी टँकरबाबत निर्णय घ्यावे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत व जिल्हा परिषद मार्फत राबविण्यात येणाऱ्या नळ पाणीपुरवठा योजनांचाही आढावा मंत्री श्री.पाटील यांनी यावेळी घेतला. जल जीवन मिशनच्या विहिरी, बांधकामे यासारखी कामे पावसाळ्यापूर्वी करण्यात यावी. ज्या गावातील योजनेचे किरकोळ काम शिल्लक आहे, अशी कामे तात्काळ पूर्ण करावीत. भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांनी मान्सूनपूर्व आणि मान्सूनपश्र्चात भूजलपातळी याबाबतचा आराखडा तयार करावा. जलस्रोत बळकटीकरण, भूजल पुनर्भरण होणे आवश्यक आहे, असेही मंत्री श्री.पाटील यांनी यावेळी सांगितले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894